नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०७/०७/२०२६ (मंगळवार )

# MARVEL या कृत्रिम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाने पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत अज्ञात महिलेवरील लैंगिक अत्याचार व खून प्रकरणाचा गुन्हा उघड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,वरीष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा , श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात तसेच तपास अधिकारी श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग यांच्या नेतृत्वात नागपूर ग्रामीण पोलीस दलाने अत्यंत संवेदनशील अशा अज्ञात महिलेवरील बलात्कार व खून प्रकरणाचा तपासादरम्यान अत्याधुनिक **MARVEL** ( **Maharashtra Research and Vigilance for Enhanced Law Enforcement**) या कृत्रिम बुद्धिमत्ता—आधारित तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून तसेच वैज्ञानिक व तांत्रिक तपास पद्धतींच्या साहाय्याने उपलब्ध पुराव्यांचे बारकाईने विश्लेषण करून तपासाची साखळी उभी करण्यात आली. या अथक व शास्त्रशुद्ध तपासातून सदर गुन्ह्याचा यशस्वीरित्या उलगडा करीत आरोपीस अटक केली आहे.

## घटनेची थोडक्यात हकीकत:—

पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत मौजा पाटणसावंगी शिवारातील छत्रपाल इंगोले यांच्या शेतात एका अंदाजे ६५ ते ७० वर्षाच्या महीलेचे प्रेत मिळुन आले. सदर घटना दिनांक

२७/०६/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपासून ते दिनांक २८/०६/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजेदरम्यान मौजा पाटणसावंगी शिवारातील छत्रपाल इंगोले यांच्या शेतात घडली असुन सदर प्रकरणी पोलीस स्टेशन सावनेर येथे अकस्मात मृत्यू ची नोंद करण्यात आली होती. मृतक महीलेच्या शवविच्छेदनानंतर वैद्यकीय अधिकारी यांनी सदर मृतक महीलेवर अनैसर्गिक लैंगिक अत्याचार करून तिचा खुन केल्याची माहीती दिली. सदर प्रकरणी सावनेर पोलीस स्टेशन येथे अपराध क्रं ६५७/२०२६ कलम ६४,१०३(१), भान्यसं अन्वये अज्ञात आरोपीविरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## तपासातील आव्हाने :—

सदर गुन्हयात मृत महिला पूर्णपणे अनोळखी असल्याने त्याचबरोबर आरोपीबाबत कोणताही धागादोरा, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अथवा प्राथमिक पुरावा उपलब्ध नसल्याने तपास अत्यंत गुंतागुंतीचा व आव्हानात्मक होता.

## पोलीस तपासाचा कृती आराखडा :—

सदर गुन्हयाचे गांभीर्य आणि संवेदनशिलता लक्षात घेऊन मा. श्री हर्ष ए. पोद्दार , वरीष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आरोपी शोध कामी विविध पथकाची स्थापना करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखा, सावनेर पोलीस स्टेशन, केळवद पोलीस स्टेशन आणि सायबर पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार यांनी विशेष परिश्रम घेवुन सदर गुन्हा उघड केला आहे. तपासादरम्यान **MARVEL** या कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या आधारे करण्यात आलेली महत्त्वाची कार्यवाही खालीलप्रमाणे आहे.

- पीडित मृत महिलेचा चेहरा सडलेल्या अवस्थेत असल्यामुळे तिची ओळख पटविण्यासाठी **Marvel AI Photo Enhancement** तंत्रज्ञानाच्या साहाय्याने तिच्या चेहऱ्याची पुनर्रचना (**Face Reconstruction**) करण्यात आली. **Reconstructed**

चेहऱ्याच्या आधारे सामाजिक कार्यकर्त्यांच्या माध्यमातून महिलेची ओळख व शोध घेण्याचे प्रयत्न करण्यात आले.

- तपासादरम्यान परिसरातील एकूण १८२ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज बारकाईने तपासण्यात आले.
- घटनास्थळ व परिसरातील सीसीटीव्ही फुटेजचे तांत्रिक विश्लेषण करण्यात आले. तपासादरम्यान पीपळा ते दहेगाव परिसरातील सीसीटीव्ही फुटेजमध्ये आरोपी दिसुन आला. आरोपीचे दूरचे सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध झाल्यानंतर **Marvel AI Photo Enhancement** तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आरोपीच्या चेहऱ्याची व शारीरिक ठेवणीची (**Face & Body Reconstruction**) पुनर्रचना करण्यात आली. तसेच तांत्रिक विश्लेषणातून आरोपी चे लोकेशन नागपूर शहर परिसरात असल्याची माहिती प्राप्त झाली. आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर त्याच्या प्रत्यक्ष चेहऱ्याची **Marvel AI Photo Enhancement** द्वारे **Reconstructed** चेहऱ्याशी आणि शरिरीक रचनेची तुलना करण्यात आली असता सुमारे ८५ टक्के साम्य दिसुन आले.
- तपासादरम्यान घटनास्थळावर मिळालेल्या चिप्सच्या पॅकेटच्या रॅपरचाही शास्त्रशुद्ध पद्धतीने तपास करण्यात आला. परिसरातील संबंधित चिप्स विक्रेत्यांची माहिती संकलित करून त्यांच्या ऑनलाइन व्यवहारांच्या नोंदींचे विश्लेषण करण्यात आले.
- सदर प्रकरणाच्या तपासात परीसारातील सुमारे ५००० **Telecom Data Trajectory** व **Mapping** करण्यात आले.
- सदर प्रकरणाच्या तपासात परीसरातील ८० ते ९० कामगार व इतर व्यक्तींची चौकशी करण्यात आली. तसेच घटनास्थळाजवळील विटभटटी व फार्म हाउस ला भेट देवुन विचारपुस करण्यात आली.
- १५,००० वाहनांचे प्रादेशिक परिवहन विभागाकडुन माहीती प्राप्त करून विश्लेषन करण्यात आले.

- पीडित/मृतक महिलेचा ओळख पटविणे कामी **ICJC** पोर्टल , **NATGRID** पोर्टल या तंत्रज्ञनाचा वापर करण्यात आला.
- पीडित/मृतक महिलेचा ओळख पटविणे कामी नागपुर शहर , नागपुर परिक्षेत्र अमरावती शहर , अमरावती परिक्षेत्र तसेच मध्यप्रदेश राज्यातील पांढुर्णा, छिंदवाडा, सिवणी जिल्हयातील सर्व मिसींग व्यक्तींची माहीती प्राप्त करून विश्लेषन करण्यात आले.
- तपासादरम्यान शेल्टर होम तसेच समाजसेवकांना विचारपुस करण्यात आली. समाजसेवकांकडुन पीडित महिलेचा खापरखेडा ते दहेगाव मार्गावर शेवटचा दिसलेला फोटो प्राप्त झाला. या महत्त्वपूर्ण माहितीमुळे तपासाला नवी दिशा मिळाली .

## आरोपीची माहीती :—

सदर गुन्हयात दिनांक ०६/०७/२०२६ रोजी पोलीसांनी आरोपी नामे सुधाकर दादाराव मंडपे, वय ४८ वर्षे, रा. बन्साळी टाकळी, ता. सावनेर, जि. नागपूर याला श्रीकृष्ण नगर, नागपुर येथुन ताब्यात घेवुन अटक करण्यात आली आहे. नमुद आरोपीला दिनां ११/०७/२०२६ रोजी पर्यंत ५ दिवस पोलीस कोठडी रिमांड मंजुर झाला आहे.

आरोपीचा पूर्व गुन्हेगारी इतिहास पडताळून तपास करण्यात आला. आरोपीवर यापूर्वीही महिला अत्याचाराचे गुन्हे नोंद असल्याची माहीती उघड झाली आहे. सन २००५ मध्ये कळमेश्वर पोलीस स्टेशन येथे एक बलात्काराचा गुन्हा नोंद असून सन २०१८ मध्ये सावनेर पोलीस स्टेशनला विनयभंगाचा गुन्हा नोंद आहे. याव्यतिरीक्त पोलीस स्टेशन सावनेर येथे मोवाहन अधिनियम कलम १८५ अन्वये १ गुन्हा आणि भादवि कलम २७४,३३७,३३८ अन्वये १ गुन्हा असे गुन्हे नोंद आहे.

INVESTIGATION STEP 2

## Tracing the Accused via CCTV

A lead indicated the victim was last seen in the Pipla-Dahegaon area. CCTV footage recovered from the location yielded a blurred image of the accused, which was processed using Marvel AI photo-enhancement technology to generate a clear, matching image.

BEFORE — CCTV (Blurred)



AFTER — AI Enhanced



Original Photograph





INVESTIGATION STEP 3

## AI-Assisted Identification of the Accused

Marvel ai generated enhance photograph of the accused



Actual photograph of the accused



# जानेवारी ते जुन २०२६ या सहामाही कालावधीत रस्ते अपघातांमध्ये घट नोंदविणाऱ्या जिल्हयांमध्ये नागपूर ग्रामीण जिल्हयाचा महाराष्ट्र राज्यात दुसरा क्रमांक

नागपूर ग्रामीण पोलिसांनी सातत्यपूर्ण व परिणामकारक रस्ते सुरक्षा उपाययोजनांद्वारे रस्ते अपघात व मृत्यूंमध्ये लक्षणीय घट साध्य केली आहे. सन २०२६ जानेवारी ते जुन मध्ये रस्ते अपघात आणि मृत्यूंमध्ये उल्लेखनीय घट नोंदविण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यात रस्ते अपघातांमध्ये घट नोंदविणाऱ्या जिल्ह्यांमध्ये मध्ये नागपुर ग्रामीणला दुसरे स्थान प्राप्त झाले आहे.

देशातील रस्ते अपघातांच्या दृष्टीने उच्च प्राधान्य असलेल्या टॉप १०० जिल्हयांमध्ये नागपूर जिल्ह्याचा समावेश असून, या अनुषंगाने येथे सेव्ह लाईफ फाउंडेशन (**SaveLife Foundation**) यांच्या तांत्रिक सहकार्याने **Zero Fatality District (ZFD)** उपक्रम राबविण्यात येत आहे. सदर उपक्रम मा. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मुख्यमंत्री कार्यालय (**CMO**) आणि मा. पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निरीक्षणाखाली प्रभावीपणे अंमलात आणला जात आहे.मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात सर्वसमावेशक व डेटा—आधारित रस्ते सुरक्षा धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून, या उपक्रमामुळे रस्ते सुरक्षा उपाययोजनांना अधिक बळकटी प्राप्त होत आहे.

नागपुर ग्रामीण जिल्हयाचा सन २०२६ जानेवारी ते जुन सहामाही कालावधीत रस्ते अपघातांमध्ये घट नोंदविणाऱ्या जिल्हयांमध्ये राज्यात दुसरा क्रमांक प्राप्त केला आहे.
जानेवारी ते जुन २०२६ मध्ये जानेवारी ते जुन २०२५ च्या तुलनेत रस्ते अपघातातील मृत्युंच्या संख्येत २३ टक्क्यांनी घट झाली झाली असुन जखमींच्या संख्येत ११ टक्क्यांनी घट झाली आहे. तसेच सदर कालावधीत एकुण अपघातांमध्ये १८ टक्क्यांनी घट झाली आहे. फक्त जुन महीन्याचा विचार करता जुन २०२६ मध्ये जुन २०२५ च्या तुलनेत जखमींच्या संख्येत १४ टक्क्यांनी घट झाली असुन मृत्युंच्या संख्येत ४५ टक्कयांनी ने घट झाली झाली आहे. एकुण अपघातांमध्ये ३३ टक्क्यांनी घट झाली आहे.

# MAHARASHTRA STATE

## Total Accidents Comparative " Descending Order "

| Sr. No | POLICE UNIT | JAN TO JUN 2025 | | | JAN TO JUN 2026 | | | COMPARATIVE % (JAN TO JUN 2025- 2026) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Total Accident | Total Killed | Total Injured | Total Accident | Total Killed | Total Injured | Total Accident | Total Killed | Total Injured |
| 1 | MB-VV | 381 | 94 | 336 | 460 | 95 | 422 | 21 | 1 | 26 |
| 2 | Gadchiroli | 130 | 95 | 108 | 155 | 74 | 238 | 19 | -22 | 120 |
| 3 | Navi Mumbai | 395 | 151 | 343 | 464 | 142 | 437 | 17 | -6 | 27 |
| 4 | Ratnagiri | 187 | 72 | 231 | 217 | 72 | 243 | 16 | 0 | 5 |
| 5 | Nasik City | 267 | 109 | 264 | 307 | 92 | 294 | 15 | -16 | 11 |
| 6 | Raigad | 335 | 138 | 412 | 384 | 164 | 450 | 15 | 19 | 9 |
| 7 | Thane R | 215 | 122 | 183 | 244 | 145 | 217 | 13 | 19 | 19 |
| 8 | Latur | 415 | 200 | 259 | 457 | 219 | 276 | 10 | 10 | 7 |
| 9 | Gondia | 183 | 94 | 116 | 200 | 114 | 150 | 9 | 21 | 29 |
| 10 | Parbhani | 276 | 135 | 235 | 298 | 148 | 202 | 8 | 10 | -14 |
| 11 | Jalna | 358 | 199 | 353 | 385 | 215 | 344 | 8 | 8 | -3 |
| 12 | C.S.Nagar R | 440 | 294 | 240 | 473 | 279 | 350 | 8 | -5 | 46 |
| 13 | Thane City | 535 | 117 | 521 | 569 | 130 | 534 | 6 | 11 | 2 |
| 14 | Hingoli | 231 | 135 | 186 | 244 | 135 | 207 | 6 | 0 | 11 |
| 15 | C.S.Nagar City | 326 | 96 | 270 | 344 | 106 | 298 | 6 | 10 | 10 |
| 16 | Beed | 401 | 243 | 256 | 423 | 191 | 280 | 5 | -21 | 9 |
| 17 | PCPC | 635 | 193 | 561 | 665 | 179 | 658 | 5 | -7 | 17 |
| 18 | Palghar | 278 | 167 | 126 | 289 | 184 | 204 | 4 | 10 | 62 |
| 19 | Dhule | 358 | 204 | 339 | 372 | 207 | 427 | 4 | 1 | 26 |
| 20 | Amravati City | 203 | 41 | 194 | 210 | 53 | 209 | 3 | 29 | 8 |
| 21 | Pune R | 996 | 513 | 814 | 1026 | 501 | 692 | 3 | -2 | -15 |
| 22 | Chandrapur | 387 | 192 | 313 | 392 | 170 | 367 | 1 | -11 | 17 |
| 23 | Pune City | 691 | 160 | 512 | 697 | 157 | 562 | 1 | -2 | 10 |
| 24 | Mumbai City | 1308 | 196 | 1339 | 1316 | 171 | 1385 | 1 | -13 | 3 |
| 25 | Solapur R | 645 | 369 | 694 | 646 | 384 | 684 | 0 | 4 | -1 |
| 26 | Nasik R | 799 | 518 | 1012 | 800 | 470 | 1053 | 0 | -9 | 4 |
| 27 | Jalgaon | 472 | 245 | 426 | 469 | 284 | 315 | -1 | 16 | -26 |
| 28 | Wardha | 196 | 100 | 192 | 194 | 101 | 153 | -1 | 1 | -20 |
| 29 | Amravati R | 264 | 165 | 188 | 258 | 171 | 218 | -2 | 4 | 16 |
| 30 | Washim | 185 | 114 | 113 | 177 | 94 | 161 | -4 | -18 | 42 |
| 31 | Satara | 542 | 293 | 401 | 510 | 258 | 362 | -6 | -12 | -10 |
| 32 | Sangli | 534 | 289 | 410 | 499 | 267 | 376 | -7 | -8 | -8 |
| 33 | Kolhapur | 594 | 217 | 539 | 553 | 223 | 499 | -7 | 3 | -7 |
| 34 | Buldhana | 376 | 217 | 342 | 346 | 201 | 261 | -8 | -7 | -24 |
| 35 | Akola | 255 | 111 | 214 | 234 | 80 | 200 | -8 | -28 | -7 |
| 36 | Nanded | 492 | 272 | 286 | 450 | 264 | 221 | -9 | -3 | -23 |
| 37 | Solapur City | 129 | 44 | 124 | 116 | 43 | 88 | -10 | -2 | -29 |
| 38 | Bhandara | 217 | 102 | 195 | 195 | 89 | 212 | -10 | -13 | 9 |
| 39 | Sindhudurg | 106 | 50 | 150 | 95 | 41 | 105 | -10 | -18 | -30 |
| 40 | Nandurbar | 197 | 121 | 261 | 169 | 94 | 258 | -14 | -22 | -1 |
| 41 | Dharashiv | 349 | 200 | 345 | 299 | 178 | 258 | -14 | -11 | -25 |
| 42 | Nagpur City | 650 | 165 | 649 | 547 | 121 | 561 | -16 | -27 | -14 |
| 43 | Ahilyanagar | 1090 | 490 | 903 | 905 | 399 | 697 | -17 | -19 | -23 |
| 44 | Nagpur R | 530 | 250 | 566 | 434 | 192 | 505 | -18 | -23 | -11 |
| 45 | Yavatmal | 467 | 265 | 326 | 367 | 212 | 229 | -21 | -20 | -30 |
| | TOTAL | 19020 | 8557 | 16847 | 18854 | 8109 | 16862 | -1 | -5 | 0 |

Page 1

# नागपूर ग्रामीण पोलिसांची एनडीपीएस कायद्यांतर्गत प्रभावी कारवाई; सहा महिन्यांत १५ गुन्हे उघडकीस, एकुण ३.८३ कोटींचा अंमली पदार्थ जप्त

नागपूर ग्रामीण पोलीस दलाने एनडीपीएस ॲक्ट, १९८५ अंतर्गत जानेवारी ते जून २०२६ या कालावधीत अंमली पदार्थांविरुद्ध प्रभावी कारवाई करत १५ गुन्हे उघडकीस आणले असून, ३,८३,३६,०५० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सन २०२५ संपुर्ण वर्षामध्ये ३३,२०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला होता. सन २०२५ च्या संपूर्ण वर्षाच्या तुलनेत जानेवारी ते जुन २०२६ मध्ये सदर मुद्देमालामध्ये १०५२ टक्कयांनी वाढ झाली आहे.

जानेवारी ते जुन २०२६ मध्ये अंमली पदार्थ विरोधी कारवाईदरम्यान ८१० किलो गांजा, ३४ किलो अफू (**Opium**) आणि ६३९ ग्रॅम एमडी (**MD**) जप्त करण्यात आला. सन २०२५ च्या संपूर्ण वर्षाच्या तुलनेत जानेवारी ते जुन २०२६ मध्ये गांजा जप्तीत ६४३ टक्के, अफू जप्तीत ५८७ टक्के आणि एमडी जप्तीत १८७३ टक्क्यांची लक्षणीय वाढ नोंदविण्यात आली.

अंमली पदार्थांच्या अवैध व्यावसायात सहभागी असलेल्या सराईत गुन्हेगारांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करत एकूण ४ टोळीतील १२ आरोपीं विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (**MCOCA**) अन्वये कारवाई करण्यात आली आहे. तसेच समाजासाठी धोकादायक अंमली पदार्थ गुन्हयातील ३ गुन्हेगारांविरुद्ध एमपीडीए (**MPDA**) कायद्यान्वये प्रतिबंधात्मक कारवाया करण्यात आल्या आहेत.



SP OFFICE · NAGPUR RURAL · NDPS ACT 1985
OFFICIAL
SEIZURE REPORT '26
Annual Comparison · Full Year 2025 vs Jan–Jun 2026
15
CASES '26
810 kg
GANJA '26
▲ 643%
34 kg
OPIUM '26
▲ 587%
₹3.83 Cr
VALUE '26
▲ 1,052%
Full Year 2025
Jan–Jun 2026
SUBSTANCE-WISE SEIZURE COMPARISON
109 kg
810 kg
4.9 kg
34 kg
32 gm
639 gm
36 kg
45.8 gm
GANJA
▲ 643%
OPIUM
▲ 587%
MD
▲ 1,873%
P. STRAW
'25 only
BR. SUGAR
'25 only
TOTAL SEIZED VALUE
Full Yr '25
₹33.2 L
Jan–Jun '26
₹3,83,36,050
₹3.83 Cr
▲ 1,052% Growth vs Full Year 2025
SP OFFICE NAGPUR RURAL
NDPS ACT 1985

# प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची विक्रीसाठी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, १ आरोपी अटक ९३ लाख २४ हजार ८८० रूपयांचा मुद्देमाल जप्त जलालखेडा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— दिनांक ०६/०७/२०२६ रोजी जलालखेडा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, चारचाकी वाहनाने अवैधरित्या प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन जलालखेडा हद्दीतील सावरकर पेट्रोल पंप येथे नाकाबंदी केली नाकाबंदी दरम्यान संशयित वाहन क्र. एम एच—४०/डी सी—२३५० हे वाहन मिळुन आले. नमुद वाहनाची तपासणी केली असता प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. **आरोपी नामे १) रविसिंह दिनेशसिंह ठाकुर, वय २५ वर्ष, रा. गाव नरौली, ता. पैलानी, जि. बांदा उत्तरप्रदेश यास ताब्यात घेवुन त्यांची चौकशी केली असता सदर तंबाखु विक्री करण्यासाठी अवैधरित्या चारचाकी वाहना मध्ये प्रतिबंधीत सुगंधी तंबाखु ठेवला असल्याची माहीती प्राप्त झाली तसेच वाहनात लोखंडी बार सुध्दा मिळुन आले.**

**वाहनातुन पंचासमक्ष वेगवेगळया कंपनीचा सुगंधित तंबाखु एकुण वजन ७,८३५ किलोग्रॅम किंमती ७४,२६,८८०/—रूपये, वाहनात असलेले लोखंडी बार किंमती ४,००,०००/—रूपये आणि चारचाकी वाहन किंमती १५,००,०००/—रूपये असा एकुण ९३,२४,८८० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**नमुद आरोपींनी सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा व वाहतुक केली आहे. नमुद आरोपीविरूद्ध पोस्टे जलालखेडा येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.**




# पोलीस स्टेशन पारशिवनी अंतर्गत खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस अटक
# पारशिवनी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिवनी :—** दिनांक ०६/०७/२०२६ रोजी फिर्यादी राजबल्लभ बिरजू चौहान, वय ३९ वर्ष, रा. बासोपिंडा, पोस्ट भूआपूर, पोलीस ठाणा— बेलच्छी बारा, जिल्हा पटना, राज्य बिहार यांनी पोलीस स्टेशन पारशिवनी येथे तक्रार दिली की, दिनांक ०६/०७/२०२६ रोजी फिर्यादी हा आपले १० चक्का ट्रेलर ट्रक क्र. एन एल— ०१/ए सी —४१०३ मध्ये जिओ पेट्रोल पंप डुमरीकला येथे डीझेल भरून निघत असता मागे असलेला ट्रक क्र. पी बी— ०५/ ए जे ९३९२ चा चालक सरदार याने हॉर्न वाजवुन फिर्यादीला ट्रक समोर काढण्यास म्हटले तेव्हा फियादीने त्याला ट्रक काढत आहो असे म्हटले असता यावरून आरोपी हा फिर्यादीला शिवीगाळ करू लागला. फिंर्यादीने आरोपीला ''शिवीगाळ करू नको'' असे म्हटले असता आरोपी हा फिंर्यादी जवळ येऊन उलट वादविवाद करून हातबुक्कीने मारहान केली त्यानंतर आरोपीने लगेच जाऊन आपल्या नमुद ट्रक मधुन तलवार

काढून आणुन फिर्यादीस जीवानिशी ठार मारण्याचा उद्देशाने फिर्यादीचे डोक्यावर व डाव्या हातावर मारून जख्मी केले व आरोपी हा आपला ट्रक घेऊन निघुन नागपुर दिशेने पळुन गेला.

**पोलीसांनी सदर प्रकरणात कलम १०९(१), ११५(२), ३५२ भान्यासं, सहकलम ४/२५ आर्म ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करून आरोपी ट्रक चालक नामे रणजितसिंग बलविंदर सिंग,वय ४० वर्षे, रा.मेंढरकलन तह.धरमकोट जिल्हा मोगा (पंजाब) याला तांत्रिक पुरावे आणि गोपनिय माहीतीच्या आधारे एमआयडीसी बोरी परिसरातून ताब्यात घेतले असुन दिनांक ०७/०७/२०२६ रोजी अटक केली आहे. आरोपीचे ताब्यातून गुन्ह्यात वापरलेली तलवार जप्त करण्यात आलेली आहे.**

## भिवापूर पोलीस स्टेशन हद्दीतील सराईत गुन्हेगार हरीश राजेश चमेडीया यास नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

**पोलीस स्टेशन भिवापूर हद्द्दीतील अवैधरीत्या सुगंधित तंबाखुची वाहतुक व विक्री व्यवसायात सक्रिय आरोपी हरीश राजेश चमेडीया, वय ३५ वर्ष, रा. भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर यास महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ)(ब) अन्वये नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार केले.**

सराईत गुन्हेगार नामे **हरीश राजेश चमेडीया, वय ३५ वर्ष, रा. भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर** याचे विरूध्द अवैध सुगंधित तंबाखुची वाहतुक व विक्री करणेबाबतचे अनेक गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्याचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यानी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. तसेच त्याच्या कृ त्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद आरोपीचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव भिवापूर पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी,उमरेड यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर

करून  वर नमुद आरोपी हरीश राजेश चमेडीया, वय ३५ वर्ष, रा. भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर याला ४ महीन्यांकरीता नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केले आहे.

नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.



हद्दपार आरोपी हरीश राजेश चमेडीया

# शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी नागपूर ग्रामीण जिल्हयात शालेय बस/वाहन चालकांच्या विशेष बैठका आणि उपाययोजना

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीच्या अनुषंगाने मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक ०७/०७/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हयातील पोलीस स्टेशन कुही, बोरी, एमआयडीसी बोरी ,उमरेड, नरखेड, खापा येथे शालेय बस आणि इतर वाहन चालक, वाहक तसेच संबंधित शाळांच्या प्रतिनिधींच्या विशेष बैठका आयोजित करण्यात आल्या. पोलीस स्टेशन कुही अंतर्गत विद्यानिकेतन इंग्लिश स्कुल कुही येथे बैठक घेतली. पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत स्वामी विवेकानंद विद्यालय बुटीबोरी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी अंतर्गत सनराईस स्कूल टाकळघाट येथे बैठक घेण्यात आली. पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत विदयासागर स्कूल आणि ओम विद्यानिकेतन स्कूल उमरेड येथे बैठक घेण्यात आली. पोलीस नरखेड अंतर्गत ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट,एव्हरग्रीन कॉन्व्हेंट,एस एफ एस स्कूल नरखेड, टाईम कन्सेप्ट कॉन्व्हेंट आणि एकलव्य विद्यानिकेतन सावरगाव येथे बैठक घेण्यात आली. तसेच खापा पोलीस स्टेशन येथे संबधीतांची बैठक घेण्यात आली.

सदर बैठकांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीस सर्वोच्च प्राधान्य देत शाळा व्यवस्थापनाला शालेय बसची फिटनेस, विमा, परवाना व इतर आवश्यक कागदपत्रे अद्ययावत ठेवणे, बस चालक व अटेंडंट यांची चारित्र्य पडताळणी (बिंतंबजमत टमतपपिबंजपवद) करून त्यांच्या राहत्या पत्त्याची व इतर आवश्यक माहितीची नोंद ठेवणे तसेच सर्व शालेय बसमध्ये आवश्यक सुरक्षा सुविधा, प्रथमोपचार पेटी, अग्निशमन यंत्र व सीट बेल्टची व्यवस्था करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी शालेय बस चालक व अटेंडंट यांना वाहन चालविताना मोबाईलचा वापर न करणे, मद्यपान करून वाहन न चालविणे, वेगमर्यादेचे पालन करणे, विद्यार्थ्यांना सुरक्षित ठिकाणीच चढविणे व उतरविणे, वाहनाच्या खिडक्यांना आवश्यक सुरक्षा जाळी व रॉड बसविणे, पावसाळयात ओव्हरहेड वीजतारा, मोठी झाडे व इतर धोकादायक ठिकाणी वाहन उभे न करणे, वाहन नियंत्रित वेगाने चालवून अचानक ब्रेक लावण्याची वेळ येणार नाही याची दक्षता घेणे तसेच सर्व वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

याशिवाय, शाळा सुरू होण्याच्या व सुटण्याच्या वेळेत शाळा परिसरात पोलीस पेट्रोलिंग वाढविण्यात आली असून वाहतूक नियंत्रणासाठी विशेष पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आला आहे. सदर बैठकींना संबंधित पोलीस स्टेशनच्या हद्दीतील शाळांचे प्रशासकीय अधिकारी, शालेय बस चालक, वाहक व अटेंडंट उपस्थित होते.


MEDIUM CONVENT
MISSION INDIA
VIDYANIKETAN ENGLISH MEDIUM CONVENT
SCHOOL


BUTIBORI









# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७५१ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०७/०७/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील २३ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७५१ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४४ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २४ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २९ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १६ आरोपी अशा एकुण १४० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ५० आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३२ आरोपी अशा एकुण १४० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २० आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १९ आरोपी अशा एकुण ७० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३९ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २७ आरोपी आणि

पोलीस स्टेशन देवलापार येथे २७ आरोपी अशा एकुण १२५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ६३ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५१ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३७ आरोपी अशा एकुण १८१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.




पोलीस स्टेशन कळमेश्वर
पोलीस स्टेशन कळमेश्वर नागपूर









मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने